# प्रेस नोट दिनांक-०४/०५/२०१९

## सिंधुदुर्ग गुन्हे अन्वेषण शाखेने ६ तासात घरफोडीतील आरोपीच्या आवळल्या मुसक्या.

---

सिंधुदुर्ग जिल्हयात मालमत्तेच्या गुन्हे संदर्भात प्रतिबंध करणेकामी गुन्हयाला आळा बसावा याकामी मा.पोलीस अधीक्षक दिक्षित कुमार गेडाम, मा.अपर पोलीस अधिक्षक तुषार पाटील यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला या संदर्भात सुचना दिलेल्या होत्या. सदर सुचनांच्या अनुषंगाने सावंतवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.१५६/२०१९ भादवि कलम ४५४,४५७,३८० हा गुन्हा दाखल होताच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने तात्काळ सदर गुन्ह्यात सावंतवाडी ,माडखोल या गावात घटनास्थळी भेट देऊन सदर गावात राहणारा आरोपीत ओमकार संजय कोठावणे, वय- २२ वर्ष, रा. नमसवाडी, ता.सावंतवाडी यास तात्काळ ताब्यात घेऊन सदर आरोपीत याने गुन्हा केलेल्याची कबुली दिलेली असुन त्यास पुढील तपासाकरीता सांवतवाडी पोलीस स्टेशनला देण्यात आलेला आहे.

सदर कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक दिक्षित कुमार गेडाम साहेब व मा.अपर पोलीस अधिक्षक तुषार पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक श्री. प्रल्हाद पाटील, सायबर शाखेचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती. वनिता कुलकर्णी सोबत पोलीस हवालदार सुधीर सावंत, पोलीस नाईक प्रविण वालावलकर , पोलीस नाईक अनिल धुरी , पोलीस कॉन्स्टेबल स्वप्नील तोरसकर , पोलीस कॉन्स्टेबल रवि इंगले यांनी केलेले असुन तात्काळ गुन्हयाचा उकल केल्याबद्दल मा.पोलीस अधीक्षक दिक्षित कुमार गेडाम साहेब यांनी सदर टिमचे कौतुकास्पद अभिनंदन केलेले आहे.

दिक्षीत गेडाम

पोलीस अधीक्षक ,सिंधुदुर्ग